**ठळक बातम्या**

- भारत आणि श्रीलंका यांच्यात ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य या महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना श्रीलंकेचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

- स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५ वर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची स्वाक्षरी

- कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाचा इशारा

**आणि**

- अभिनेता मनोजकुमार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या श्रीलंका दौऱ्यात आज दोन्ही देशांमध्ये ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य अशा एकूण सात महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात प्रतिनिधिमंडळ स्तरावर चर्चा झाल्यांनतर केलेल्या संयुक्त निवेदनात दोन्ही नेत्यांनी आपली भूमिका मांडली. प्रधानमंत्री मोदी म्हणाले…..

**होल्ड बाईट प्रधानमंत्री**

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना “श्रीलंका मित्र विभूषण” हा श्रीलंकेचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारताच्या ‘शेजारी देशांना

प्राधान्य’ धोरणात आणि व्हिजन महासागर संकल्पात श्रीलंकेला विशेष स्थान असल्याचं सांगून प्रधानमंत्र्यांनी श्रीलंकेची वाटचाल प्रगतीपथाकडे होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं. भविष्यात दोन्ही देशांमधली भागीदारी नव्या उंचीवर नेण्यासाठी वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. श्रीलंकेतल्या काही मंदिरांच्या निर्मितीसाठी भारत सहकार्य करेल, असं ते म्हणाले. भारताच्या सहकार्यानं श्रीलंकेत सुरु असलेल्या अनेक विकासकामांचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.

<><><><><>

रामनवमी निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या तामिळनाडूला भेट देणार असून रामेश्वरमला मुख्य भूमीशी जोडणाऱ्या नवीन पांबन रेल्वे पुलाचं उद्घाटन करणार आहेत. आकाशवाणीवरून या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार असल्यानं आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र उद्या दुपारी एक वाजून पाच मिनिटांनी प्रसारित होईल.

<><><><><>

बासष्टाव्या राष्ट्रीय सागरी दिनानिमित्त केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज नवी दिल्लीत सागरी जनजागृती वॉकेथॉनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. भारताच्या नौवहन क्षेत्राला समृद्ध इतिहास असून हे क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा एक आधारस्तंभ आहे, देशाला जगातली सामर्थ्यशाली सागरी सत्ता बनवण्यात युवावर्ग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असं सोनोवाल यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय सागरी दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या समृद्ध सागरी इतिहासाचं स्मरण केलं आहे. केंद्र सरकार नौवहन क्षेत्राला आणि देशातल्या बंदरांना अधिक मजबूत करण्यासाठी निरंतर प्रयत्न करत राहील, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाधारित विकासात भारत जागतिक नेता म्हणून उदयास येईल असं प्रतिपादन वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं कालपासून स्टार्टअप महाकुंभ कार्यक्रमाच्या दुसऱ्या आवृत्तीला सुरूवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. भारतीय तरूण जग काबीज करण्यास उत्सुक आणि सज्ज असल्याचं ते म्हणाले. या आवृत्तीत ३ हजारांहून अधिक स्टार्टअप्स, एक हजाराहून अधिक गुंतवणूकदार आणि व्यवसाय विकास संस्था आणि ५० हून अधिक देशांतील सुमारे दहा हजार प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

परदेशी शिक्षण घेऊन नंतर पुन्हा भारतात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मानकीकरणाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतला आहे. आयोगाचे अध्यक्ष मामिदला जगदेश कुमार यांनी जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलंय की परदेशी शिक्षणसंस्थांमधून घेतलेल्या पदव्या, पदविका आणि इतर पात्रता प्रमाणपत्रांना मान्यता देऊन, भारतातल्या शिक्षणसंस्थांच्या परिप्रेक्ष्यात त्यांचं मानकीकरण करण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित आणि पारदर्शी पद्धत आयोगाने विकसित केली आहे.

<><><><><>

माजी उपप्रधानमंत्री बाबू जगजीवनराम यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे. वंचित आणि शोषितांच्या कल्याणासाठी बाबू जगजीवनराम यांनी दिलेला अविरत लढा प्रेरणादायी असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर लिहीलेल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५ वर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वक्षरी केली आहे. परदेशी नागरिकांचा भारत प्रवेश, वास्तव्य आणि स्थलांतर याविषयीचे नियम या विधेयकात आहेत. यापूर्वीचे पारपत्र कायदा १९२०, परदेशी नागरिक नोंदणी कायदा १९३९, तसंच परदेशी नागरिक कायदा १९४६ आणि भारतात स्थलांतर कायदा २००० हे ब्रिटीशकालीन कायदे या नव्या कायद्याने मोडीत काढले आहेत. गेल्या आठवड्यात संसदेने हे विधेयक मंजूर केलं. नवीन कायद्यानुसार बनावट पारपत्र वापरणं किंवा पुरवणं या गुन्ह्यांकरता ७ वर्षं पर्यंत कैद आणि १० लाख रुपयेपर्यंत  दंड अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

<><><><><>

एमआयडीसी असलेल्या गावांना औद्योगिक नगरीचा दर्जा देण्यासंदर्भात धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत काल ते बोलत होते. औद्योगिक क्षेत्राचा विकास अधिक वेगानं करण्यासाठी एमआयडीसी असलेल्या गावांना औद्योगिक नगरीचा दर्जा दिल्यास त्या गावांच्या विकासाबरोबरच संबंधित भागात मूलभूत सुविधा आणि पायाभूत प्रकल्पांचा विकास वेगानं होईल.

त्याचप्रमाणे पाणीपुरवठा, रस्ते, वीज आणि इतर सुविधा सुधारण्यावर भर दिला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या अनेक भागांना गेल्या दोन दिवसात अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका बसला आहे. २४ जिल्ह्यातल्या ११० तालुक्यांतल्या २६ ते २७ हजार एकरांवरच्या पिकांचं नुकसान झालं आहे. अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी येत्या चार-पाच दिवसांत आपत्ती व्यवस्थापन विभागाची बैठक घेण्यात येईल, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली. नाशिकमध्ये ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं आज कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यांचा इशारा दिला आहे. तसंच ९ एप्रिल पर्यंत कोकण आणि गोव्यात उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता वर्तवली आहे.

**<><><><><>**

शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. महायुती सरकार शेतकऱ्यांचा अपमान करण्याची एकही संधी सोडत नाही असं सपकाळ म्हणाले.  कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून वक्तव्य केलं होतं.

**<><><><><>**

रामनवमी निमित्त राज्यात अनेक ठिकाणी रामजन्मोत्सव साजरा होणार असून त्या दृष्टीने मंदिरांमधे तयारी सुरु आहे. शिर्डीमध्ये साईबाबा समाधी मंदिरात आजपासून रामनवमी उत्सवाला प्रारंभ झाला असून तो ७ एप्रिल पर्यंत चालणार आहे. गोंदिया शहरात रामनवमीनिमित्त आज बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आलं होत.

<><><><><>

प्रख्यात चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक मनोज कुमार यांच्या पार्थिवावर आज मुंबईच्या पवन हंस स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अभिनेता अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, प्रेम चोप्रा, सलीम खान, रझा मुराद, राजपाल यादव, दिग्दर्शक सुभाष घई यांच्यासह मनोरंजनविश्वातले मान्यवर यावेळी उपस्थित होते. मनोज कुमार यांचं काल पहाटे खासगी रुग्णालयात वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झालं. देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जाणारे मनोज कुमार हे भारत कुमार या टोपणनावानेही ओळखले जात.

<><><><><>

ज्येष्ठ अभिनेते डॉ. विलास उजवणे यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ६२ वर्षांचे होते. काही वर्षांपूर्वी त्यांना पक्षाघाताचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना हृदयविकाराचाही त्रास जाणवू लागल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली.

//<><><><><>//